# तर अर्थव्यवस्था मंदावेल

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा इशारा



बुलढाणा अर्बन बँकेने खातेदारांना दिलेल्या ऑटोवोल्ट या सुविधेचे उद्घाटन करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी. सोबत अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट आदी. (छाया : बी. एल. सोनी)

**वृत्तसंस्था**

मुंबई, सोमवार- कर्ज थकवणाऱ्या प्रत्येक उद्योगपतींच्या विरोधात कारवाई केल्यास अर्थव्यवस्था मंदावेल. त्यामुळे व्यवसाय करण्यासाठी कोणतीही धोका पत्करायला तयार होणार नाही, असा इशारा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिला.

शिवाजी पार्क येथे बुलडाणा नागरी सहकारी क्रेडिट सोसायटी लि.च्या उद्घाटन सोहळ्यात 'ऑटोव्हॉल्ट' या स्वयंचलित सेफ डिपॉझिट लॉकरचा शुभारंभ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याहस्ते झाला. बहुस्तरीय सुरक्षा प्रणालीने सज्ज असलेल्या ऑटोव्हॉल्टमुळे ग्राहकांना कोणत्याही त्रासाविना तसेच कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपाविना आपला मौल्यवान ऐवज कोणत्याही वेळी उपलब्ध होऊ शकेल. याशिवाय, या उपाययोजनेमुळे ग्राहकाला रुममध्ये पूर्णपणे गोपनीयता राखली जाईल. आपले स्मार्ट/ ॲक्सेस कार्ड स्वाईप केल्यावर त्याला/ तिला लॉकर रुमपर्यंत पोहोचता येईल.

या कार्यक्रमात ते म्हणाले की, उद्योजक घेतलेले कर्ज तो फेडू शकला नाही, याचे कारण समजून घेतले पाहिजे. व्यवसाय चालवताना अनेक अडचणी किंवा जागतिक परिस्थितीकडे पाहणे गरजेचे असते. प्रत्येक कर्ज थकवणाऱ्यांच्याविरोधात कारवाई करू नये. तसेच उद्योजकांना खऱ्या कारणांमुळे अडचण आली असल्यास त्याला सहाय्य केले पाहिजे. आपण उद्योजकांना प्रोत्साहन न दिल्यास आणि त्यांचे संरक्षण केल्यास कोणतीच व्यक्ती उद्योगात पडण्याचा धोका पत्करणार नाही. जर उद्योजकता मृत पावल्यास भांडवल गुंतवणूक कोण करणार ? असा सवाल त्यांनी केला. याचा फटका देशाच्या अर्थव्यवस्थेला बसेल.

एखाद्या उद्योजकाचे कर्ज बुडित खात्यात गेल्यावरही त्याला गरज पडल्यास आर्थिक पुरवठा केला पाहिजे. तसेच बँकर्सवर केल्या जाणाऱ्या प्रत्येक कृतीवर शंका उपस्थित करू नये. बँकांवर याबाबतच्या कारवाया सतत होऊ लागल्यास अर्थव्यवस्था कशी पुढे जाईल. कोणी जाणून बुजून चूक केल्यास त्याच्यावर कठोर कारवाई व्हायला पाहिजे. तसेच दिल्लीत बसलेल्या लोकांनी सहकारी क्षेत्र कसे चांगले चालेल हे समजून घेतले पाहिजे. सहकार म्हणजे राजकीय विश्वस्तपणा किंवा पूर्ण भ्रष्टाचारी संस्था नव्हेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

आर्थिक धोरणे राबवताना ती जनताभिमुख, शेतकरीभिमुख राबवण्याऐवजी ती समर्थन करता येऊ शकतील, अशी आखावीत, असे गडकरी म्हणाले.

ते म्हणाले की, लोकशाहीत विरोधकांचे ऐकणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येकाचे मत विचारात घ्यावे. त्याचा फायदा नागरिकांना होऊ शकतो.

तसेच न्यायमंडळाने आपल्या मर्यादेत राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.